अहिल्यानगरमध्ये ठाकरे गट सैरभैर

मोहनीराज लहाडे, लोकसत्ता

या परिस्थितीची माहिती वरिष्ठांना कळविलेली आहे. काल, शनिवारी संपर्कप्रमुख सुनील शिंदे यांनी अहिल्यानगरमध्ये येऊन कार्यकर्त्यांची बैठक घेतली व म्हणणे जाणून घेतले आहे. विरोधी पक्षात राहून लढाऊपणा दाखवणे प्रत्येकाला जमते असे नाही. त्यामुळे प्रत्येकाला सत्ताधारी पक्षात असावे असे वाटते आहे.
-शशिकांत गाडे, जिल्हाप्रमुख, शिवसेना ठाकरे गट

अहिल्यानगर : गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेनेच्या ठाकरे गटामध्ये निर्माण झालेली अस्वस्थता आता आगामी महापालिकेच्या निवडणुकीचा वेध घेत बाहेर पडू लागली आहे. काही माजी नगरसेवकांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला आहे तर आणखी काही पदाधिकारी जाण्याच्या मार्गावर आहेत. काहीजण भाजपच्या संपर्कात आहेत. मात्र त्यांना थांबवणारे कोणी नाही. वरिष्ठांबद्दलच असंतोष निर्माण झालेला असल्याने स्थानिक पदाधिकारीही ऐकण्याच्या मनःस्थितीत नाहीत. अलीकडच्या काळापर्यंत एकत्रित शिवसेनेचे अहिल्यानगर शहरावर वर्चस्व होते. ते आता लयाला जाताना दिसत आहे.

ठाकरे गटातून बाहेर पडताना कार्यकर्त्यांचा बराचसा ओढा शिंदे गटाकडे आहे तर काही प्रमाणात भाजपकडे आहे. दोन्ही राष्ट्रवादीचा किंवा काँग्रेसचा पर्याय मात्र त्यांना मान्य नाही. ठाकरे गटाचे वर्चस्व कमी होताना शहरात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे वर्चस्व वाढलेले आहे. मात्र या राष्ट्रवादीच्या नेतृत्वाशी त्यांचे परंपरागत वैमनस्य आहे. हा विरोधच त्यांचा जनाधार आहे. शरद पवार गट किंवा काँग्रेसचे शहरातील अस्तित्व तेवढे सक्षम नसल्याने हा पर्याय त्यांना मान्य होण्यासारखा नाही.

दोन दिवसांपूर्वी ठाकरे गटाच्या तीन माजी नगरसेवक व काही पदाधिकाऱ्यांनी मुंबईत जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला. आणखी काही जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याशी प्रवेशासाठी चर्चा केली. शहराचे राजकारण बहुतांशी महापालिकेभोवती फिरत असते. महापालिकेच्या निवडणुका नजिकच्या काळात होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सत्ताधारी पक्षात असल्यास आपली कामे मार्गी लागतील, असा विश्वास प्रवेशोत्सुक पदाधिकाऱ्यांना वाटतो आहे. शहरावर शिवसेनेने अनिल राठोड यांच्या माध्यमातून दीर्घकाळ राज्य केले.

राठोड यांच्यानंतर शिवसेनेकडे एकमुखी नेतृत्व राहिले नाही. राठोड यांच्या अखेरच्या काळातच त्यांना फंदफितुरीला सामोरे जावे लागले होते. शहरात दीर्घकाळ शिवसेनेचे सर्वाधिक संख्येने नगरसेवक निवडून येत. आता तेच पक्ष सोडू लागले आहेत आणि त्यांना थांबवण्यासाठी वरिष्ठ, स्थानिक पातळीवरील नेतृत्व तयार नाही. त्यामुळे ठाकरे गटातील कार्यकर्त्यांची राजकीय मनःस्थिती सैरभैर झालेली आहे.

जिल्ह्यात एकत्रित शिवसेनेची सर्वाधिक ताकद शहरात होती. महापालिकेत हा पक्ष सातत्याने सत्तेत असायचा. त्यामुळे जिल्ह्यातील कार्यकर्ते शहरातील नेतृत्वाकडे आकर्षित व्हायचे. मात्र आता जिल्ह्यात गेल्या दहा वर्षांपासून पक्षाचा एकही आमदार निवडून आलेला नाही. गेल्यावेळी अपक्ष म्हणून निवडून आलेले शंकरराव गडाख तांत्रिकदृष्ट्याच शिवसेनेत आहेत. स्थानिक पदाधिकाऱ्यांशी त्यांचे सूर कधी जुळले नाहीत. त्यामुळे ठाकरे गटाकडे आता नेतृत्व राहिले नाही.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत अहिल्यानगर व पारनेर मतदारसंघाच्या जागेसाठी स्थानिक पदाधिकारी आग्रही होते. परंतु त्यांना विचारात न घेता परस्पर ठाकरे गटाने श्रीगोंद्याची जागा स्वीकारून महाविकास आघाडीतील शरद पवार गटाला अहिल्यानगर व पारनेरच्या जागा बहाल केल्या. श्रीगोंद्यातही उमेदवारी लादली गेली. या सर्व परिस्थितीचा रोष निर्माण झालेला आहे. म्हणूनच या भागातून गळतीला सुरुवात झाली आहे.

पोलीस क्रीडा स्पर्धांना सुरुवात; ९०० खेळाडूंचा सहभाग

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : ३५ व्या नाशिक परिक्षेत्र पोलीस क्रीडा स्पर्धांना आज, रविवारी शहरातील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरुवात झाली. स्पर्धा १० जानेवारीपर्यंत सुरू राहतील. अहिल्यानगरसह नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार अशा पाच जिल्ह्यांतील ९०० पोलीस खेळाडू कर्मचारी स्पर्धेत सहभागी झाले आहेत. त्यामध्ये ३०० महिला खेळाडू कर्मचारी सहभागी आहेत.

नऊ वर्षांनंतर अहिल्यानगरमध्ये पोलीस क्रीडा स्पर्धा होत आहेत. यापूर्वी सन २०१६ मध्ये नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा झाल्या होत्या. सन २०२१ मध्ये करोनामुळे स्पर्धा होऊ शकल्या नाहीत. शहरातील पोलीस मुख्यालयाचे मैदान, पेमराज सारडा महाविद्यालय व वाडिया पार्क क्रीडा संकुलातील मैदानावर या स्पर्धा होत आहेत. हॉकी, फुटबॉल, खो-खो, कबड्डी, व्हॉलिबॉल, मैदानी, ज्युडो, कुस्ती, हँडबॉल, बास्केटबॉल, जलतरण, मुष्टीयुद्ध, शरीरसौष्ठव, वजन उचलणे, तायक्वांदो अशा विविध स्पर्धा सहा दिवसांत होतील. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या हस्ते आज या स्पर्धांना सुरुवात झाली. ८ जानेवारीला या स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन होईल. शहरातील विविध मंगल कार्यालयातून खेळाडूंच्या निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

आज पहिल्या दिवशी नाशिक शहर व जळगाव संघात हॉकीचा सामना झाला. नाशिक शहराने विजयी सलामी दिली. नाशिक ग्रामीण व धुळे संघात हँडबॉलचा पहिला सामना झाला. यात नाशिक ग्रामीणने विजयी सलामी दिली. सायंकाळी उशिरा अहिल्यानगर विरुद्ध धुळे हॉकीचा, अहिल्यानगर विरुद्ध नाशिक शहर खो-खो, जळगाव विरुद्ध नाशिक ग्रामीण यांच्यात व्हॉलिबॉल सामना सुरू होता. काही जिल्ह्याचे संघ दुपारी उशिरा शहरात दाखल झाल्याने काही सामने उशिराने सुरू झाले.

साई संस्थानच्या २ हजारांवर कंत्राटी कर्मचाऱ्यांची सुविधांची मागणी

लोकसत्ता वार्ताहर

राहाता : शिर्डीतील श्री साईबाबा संस्थानमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियमाप्रमाणे रजा व सुट्या पूर्वलक्षी प्रभावाने तत्काळ लागू करण्याच्या सूचना साई संस्थानने बीव्हीजी इंडिया तसेच इतर ठेकेदार कंपन्याना द्याव्यात, अशी मागणी साईबाबा संस्थान असंघटित कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाने संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात म्हटले की, साई संस्थानमध्ये सुमारे २ हजार कंत्राटी कर्मचारी विविध ठेकेदारांमार्फत १५ ते २० वर्षांपासून कार्यरत आहेत. राज्य शासनाने कायदा करून कंत्राटी कर्मचाऱ्यांना पगारी रजा, सुट्या व इतर लाभाच्या सुविधा दिलेल्या आहेत. त्याबाबत संस्थानच्या ई-निविदेतही नमुद केलेले आहे व बीव्हीजी इंडिया ठेकेदार कंपनीला दिलेल्या कार्यादेशामध्येही रजा-सुट्या देणेबाबत स्पष्टपणे नमुद आहे.

मात्र, त्यांनी निविदा व कार्यादेशाप्रमाणे रजा-सुट्या दिलेल्या नाहीत. यापूर्वी याच कारणामुळे संस्थानला ई-निविदा प्रक्रिया रद्द करून फेर-निविदा प्रसिद्ध करण्यास भाग पडले होते. कायद्याची अंमलबाजवणी योग्यरीत्या होत नसल्याने ठेकेदारांमार्फत कार्यरत २ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे. संस्थानमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियमानुसार रजा व सुट्या पूर्वलक्षी प्रभावाने तत्काळ लागू करण्याच्या सक्त सूचना ठेकेदार कंपनीला संस्थानने द्याव्यात, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष महेंद्र कोते, रामराव शेळके, सुनील कोते, दीपक तुरकणे, गोटीराम दाढे, दत्तात्रय देवकर, जयेश लाडवंशी, सुनील मांजरेकर, शरद मते आदींच्या सह्या आहेत.

'शब्दगंध'च्या संमेलनाध्यक्षपदी संजीवनी तडेगावकर

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : येथील सोळाव्या शब्दगंध साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ लेखिका संजीवनी तडेगावकर (जालना) यांची निवड करण्यात आली आहे. 'शब्दगंध'चे संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी ही माहिती दिली.

शब्दगंध साहित्यिक परिषदेची बैठक राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कवयित्री शर्मिला गोसावी यांनी डॉ. संजीवनी तडेगावकर यांचे नाव सुचवले तर त्यास कवयित्री स्वाती ठुबे यांनी अनुमोदन दिले व सर्वानुमते त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. फेब्रुवारीमध्ये अहिल्यानगर येथे होणाऱ्या सोळाव्या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर या 'आशयघन' मराठी वाङ्मयीन त्रैमासिकाच्या संपादक असून, अनुभव प्रतिष्ठानच्या अध्यक्ष आहेत. त्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या संचालक असून, प्रतिष्ठान मासिक संपादक मंडळाच्या सदस्या म्हणूनही त्या कार्यरत आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा इंदिरा संत पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

इसळकमध्ये दोन ठिकाणी दरोडे,

अहिल्यानगर : शहराजवळील इसळक शिवारातील, खारेकर्जुने रस्त्यावरील खपके वस्ती येथे दरोडेखोरांच्या ६ ते ७ जणांच्या टोळीने शस्त्राचा धाक दाखवत दोन घरांवर दरोडा टाकला. सोन्याचे दागिने, रोकड असा लाखाचा ऐवज लांबवला. चोरट्यांच्या दहशतीमुळे इसळक शिवारात भीतीचे वातावरण पसरले आहे. काल, शनिवारी मध्यरात्रीनंतर ही घटना घडली. यासंदर्भात अनिल सुधाकर खपके (रा. खपके वस्ती, खारेकर्जुने रस्ता, इसळक) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एमआयडीसी पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे. दरोडेखोरांचा शोध एमआयडीसी पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घेत आहेत. शनिवारी मध्यरात्रीनंतर सव्वा दोनच्या सुमारास सहा ते सात चोरट्यांनी खपके यांच्या घरात प्रवेश केला.

FORM NO. 14 [See Regulation 33(2)] By Regd. A/D, Dasti failing which by Publication.

OFFICE OF THE RECOVERY OFFICER-I DEBTS RECOVERY TRIBUNAL AURANGABAD.

Ground Floor, Jeevan Suman LIC Building, Plot No. 3, N-5, CIDCO, Aurangabad - 431 003

DEMAND NOTICE Exhibit No. 7

NOTICE UNDER SECTIONS 25 TO 28 OF THE RECOVERY OF DEBTS & BANKRUPTCY ACT, 1993 AND RULE 2 OF SECOND SCHEDULE TO THE INCOME TAX ACT, 1961.

RC/230/2024 **17-12-2024**

BANK OF BARODA // Versus // **HARIBHAU KHEMNAR**

To

(CD 1) Haribhau Sahadu Khemnar
R/o. At Post Ambhore, Tq. Sangamner, Dist. Ahmadnagar.
(CD 2) Satyabhama Sahadu Khemnar
R/o. At Post Ambhore, Tq. Sangamner, Dist. Ahmadnagar.
(CD 3) Revaji Hanmanta Waghmode
R/o. At Post Ambhore, Tq. Sangamner, Dist. Ahmadnagar.
(CD 4) Kondaji Hanmanta Waghmode
R/o. At Post Ambhore, Tq. Sangamner, Dist. Ahmadnagar.

This is to notify that as per the Recovery Certificate issued in pursuance of orders passed by the **Presiding Officer, DEBTS RECOVERY TRIBUNAL AURANGABAD** in **OA/569/2019** an amount of **Rs 1984677 (Rupees Nineteen Lakhs Eighty Four Thousands Six Hundred Seventy Seven Only)** along with pendentellite and future interest @ 8% Simple Interest Yearly w.e.f. 15/06/2024 till realization and costs of **Rs 22000 (Rupees Twenty Two Thousands Only)** has become due against you (Jointly and severally/ Fully/ Limited).

2. You are hereby directed to pay the above sum within 15 days of the receipts of the notice, failing which the recovery shall be made in accordance with the Recovery of Debts Due to Banks and Financial Institutions Act, 1993 and Rules there under.
3. You are hereby ordered to declare on an affidavit the particulars of yours assets on or before the next date of hearing.
4. You are hereby ordered to appear before the undersigned on **22/01/2025 at 10:30 a.m.** for further proceedings,
5. In addition to the sum aforesaid, you will also be liable to pay:
(a) Such interests as is payable for the period commencing immediately after this notice of the certificate / execution proceedings.
(b) All costs, charges and expenses incurred in respect of the service of of the service this notice and warrants and other processes and all other proceedings taken for recovering the amount due.

Given under my hand and the seal of the Tribunal, on this date: **17/12/2024**

(Sharad Baviskar)
Recovery Officer-1.
Debt Recovery Tribunal, Aurangabad

Seal

सरकारी सौरऊर्जा प्रकल्पांना विरोध करणाऱ्यांवर कारवाईचे आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : सरकारी सौरऊर्जा प्रकल्पांना विरोध करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांनी दिले आहेत. याबरोबरच जिल्ह्यात सौर प्रकल्पासाठी प्रशासनाने जमिनी उपलब्ध करून दिल्या आहेत, अशा प्रकल्पांच्या कामांना संबंधित संस्थेने गती द्यावी, असेही आदेश त्यांनी दिले आहेत. शेतकऱ्यांना अखंडित वीज उपलब्ध व्हावी यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना सुरू केली आहे. जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांचा आढावा जिल्हाधिकारी सालीमठ यांनी घेतला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील तसेच जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, महावितरण व वन विभागाचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. रत्नापूर (जामखेड) येथील काम दोन-तीन दिवसात सुरू करा, बेलवंडी (श्रीगोंदा) येथे जुन्या गावठाणातील जागा सौर प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तयार करावा, बांबोरा (कर्जत) उपकेंद्राच्या परिसरात १० मेगावॅट प्रकल्पासाठी ३० एकर जागा निश्चित करावी, खर्डा (जामखेड) येथे तांत्रिक अडचणी असल्याने वाकी व नायगाव येथे जागा देऊन प्रकल्प उभारणीसाठी पाहणी करा, केळवड (राहता) येथील प्रकल्पाचे काम त्वरित सुरू करा, या ठिकाणी जागेची उपलब्धता लक्षात घेऊन ५ मेगावॅटपेक्षा अधिक वीज निर्मितीसाठी प्रयत्न करावेत, गुंडेगाव (ता. अहिल्यानगर) प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याचा प्रस्ताव तयार करा, खरातवाडी (श्रीगोंदा) येथील नागरिकांशी संवाद साधून काम सुरू करावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

दहिगाव, शहरटाकळी (शेवगाव) येथे प्रकल्पासाठी जागेचा शोध घ्या, खापरेवाडी, हकलापूर (राहता), संगमनेरमधील धांदरफळ, श्रीरामपूर सूतगिरणी परिसर, वांबोरी (राहुरी), लोणीमावळा, जावळा, राळेगण (पारनेर), नेवासा एमआयडीसी, पेमगिरी (संगमनेर), चास (कोपरगाव), राजुरी (जामखेड) येथे जागा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती कारवाई करावी अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

संबंधित संस्थेने भाडेतत्त्वावर खासगी जागेचा शोध घ्यावा. प्रशासनातर्फे समन्वय साधण्यासाठी सहकार्य केले जाईल असेही त्यांनी सांगितले. सर्व प्रकल्पाची कामे करताना सुरक्षेच्या दृष्टीने समस्या येऊ नयेत, त्यासाठी पोलिसांचे सर्व सहकार्य राहील असे पोलीस अधीक्षक ओला यांनी सांगितले. निमगाव डाकू (कर्जत) येथील प्रकल्पाचे काम सुरू झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर
ई-निविदा सुचना क्र. 41 सन 2024-2025

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदरांकडून खालील कामांकरीता ब-1 नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **https://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ. क्र.	कामाचे नांव	कामाची अंदाजित किमत रुपये	बयाणा रक्कम	निविदा संचाची फी रुपये	नोदणी वर्ग	काम पूर्ण करण्याचा कालावधी
1	मौजे विरगांव येथील हनुमान मंदिरास सभामंडप बांधकाम करणे ता. अकोले जि. आहिल्यानगर	7110103	72000	1180	वर्ग- IVA व त्यावरील	6 महिने (पावसाळ्यासह)
2	धांदरफळ बु. ते करमाळा रस्ता (ग्रा.मा. 208) कि.मी. 2.00 मध्ये सुधारणा करणे, ता. अकोले जि. आहिल्यानगर	6330563	64000	1180	वर्ग IVA व त्यावरील	6 महिने (पावसाळ्यासह)

निविदेचे वेळापत्रक

1	**ई-निविदा उपलब्ध कालावधी**	:	**दिनांक 06.01.2025 ते 30.01.2025**
2	**निविदा उघडणे**	:	दिनांक :- **03.02.2025** कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात सकाळी 11.00 वा.
3	Online निविदेची "हार्ड कॉपी" सिलबंद लखोटयात सादर करण्याचा दि.		कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात दि. **03.02.2025** रोजी **17.00** पर्यंत किंवा त्यापुर्वी

सविस्तर निविदा सुचना व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
The Details of works Provided in the websites as below.
1. www.mahapwd.com 2. https://mahatenders.gov.in
1. सदर कामाच्या सर्व किंवा एक निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर

विमाका/नाशिक/जाहिरात/458/2025

शेतजमिनीच्या वादातून कुटुंबावर हल्ला; ५ जखमी

लोकसत्ता वार्ताहर

कर्जत : शेतजमिनीच्या वादातून माहीजळगाव येथील कुटुंबावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. यात ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. यासंदर्भात ७ जणांवर मिरजगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये करमाळा (सोलापूर) येथील काहींचा समावेश आहे.

हनुमंत नामदेव माने व दिपाली हनुमंत माने यांनी त्यांचे करमाळा येथील नातेवाईक भारत राहुल जाधव, बाळू राव जाधव, अजय भारत जाधव, सनी बाळू जाधव, गणेश बाळू जाधव व इतर सात ते आठ जणांना बोलावून नामदेव माने, कमल नामदेव माने, अनिल माने, स्वाती दिलीप जाधव, रेखा जाधव, शोभा जाधव व पीयूष जाधव यांना, आम्हाला जमीन वाटून का मागत आहात असे म्हणत सत्तूर, गज व काठीने जबर मारहाण करण्यात आल्याची तक्रार आहे. परिसरातील नागरिकांनी सोडवणूक केल्याने यातील काही जणांचे प्राण बचावले. पाच जण गंभीर जखमी आहेत. त्यांच्यावर मिरजगाव येथील खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी स्वाती दिलीप जाधव यांनी मिरजगाव पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. आरोपी गावामध्ये फिरत आहेत. यामुळे पोलिसांची भूमिका गुन्हेगारांना मदत करणारी आहे, असा आरोप स्वाती दिलीप जाधव यांनी केला आहे.

'तुमचा संतोष देशमुख करू'

बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृण हत्या करण्याची घटना राज्यभर गाजत आहे. माहीजळगाव येथे हल्लेखोरांनी जबर मारहाण करताना 'तुमचा देखील संतोष देशमुख करू' असे ओरडून म्हणत हल्ला केल्याची स्वाती जाधव यांची तक्रार आहे.

जरांगेंविरुद्ध अदखलपात्र गुन्हा

छत्रपती संभाजीनगर : अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्या विरुद्ध मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी परभणीतील मूक मोर्चादरम्यान काढलेल्या विधानावरून त्यांच्यावर परळी शहर पोलीस ठाण्यात रविवारी सायंकाळी अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी तुकाराम बाबूराव अघाव यांनी तक्रार दिली आहे. परळी पोलीस ठाण्यासमोर ओबीसी समाजाच्या वतीने धनंजय मुंडे यांच्या विरोधात करण्यात येणाऱ्या विधानांवरून दुपारच्या वेळी जोरदार निदर्शने करण्यात आली. मनोज जरांगे, अंजली दमानिया व सुरेश धस यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशा घोषणा देण्यात आल्या.

गॅसवाहिनीप्रश्नी लंकेंनी लक्ष वेधले

अहिल्यानगर : शहरात भारत पेट्रोलियम कंपनीमार्फत घरगुती गॅस वाहिनी देण्याचे काम ९ सप्टेंबर २०१८ पासून सुरू असून, अद्याप संपूर्ण शहरात गॅसवाहिनी जोडण्या देण्याचे काम पूर्ण झाले नसल्याने खासदार नीलेश लंके यांनी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे लक्ष वेधले आहे. यासंदर्भात कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करण्याची सूचना खा. लंके यांनी केली आहे.

भारत पेट्रोलियम कंपनीच्या वतीने अहिल्यानगर शहरात २०१८ पासून घरगुती गॅसवाहिनी जोडणी देण्याचे काम सुरू असले तरी हे काम अद्यापही अपूर्ण आहे. यासंदर्भात आपणाकडे स्थानिक नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. गेल्या सहा वर्षांपासून हे काम सुरू असताही हे काम पूर्ण झालेले नाही. ही योजना केंद्र सरकारची असून, संपूर्ण शहरात गॅस जोडणी देणे हे केंद्र सरकारचे उद्दिष्ट होते. परंतु, कंपनीने हे उद्दिष्ट अपूर्ण ठेवलेले आहे. हिवाळी अधिवेशनात केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरजितसिंह पुरी यांची भेट घेऊन आपण या प्रश्नावर चर्चा केली. त्यावेळी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करून मार्ग काढण्याचे मंत्र्यांनी सुचित केले होते. त्या अनुषंगाने कंपनीच्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्याची मागणी केली.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

व्यवसायविषयक

इनोवा, थार, फॉर्च्युनर कार भाडेकरारावर लावा, उत्पन्न मिळवा. हॉटेल, रिसॉर्ट, धाबा, व्हिलाफार्म, रनिंग ॲग्रोफूड, गारमेंट, विविध इंडस्ट्रियल लघुउद्योग आम्ही चालविण्यास घेतो- 8793797469/ 8080863961.
0070943277-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडवर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार, कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

अॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि., (अर्सिल) CIN : U65999MH2002PLC134884 वेबसाइट : https://auction.arcil.co.in

Arcil Premier ARC

विविध अर्सिल ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून आपल्या क्षमतेनुसार काम पाहणारे
अर्सिल कार्यालय : द रुबी, 10 वा मजला, 29, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई - 400028.
शाखा कार्यालय : युनिट क्रमांक 211 आणि 212, दुसरा मजला, प्लॉट क्र. 28/2, झेनिथ कॉम्प्लेक्स, के. एम. गांधी पथ, शिवाजी नगर, पुणे - 411005.

ऑनलाईन ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीसाठी जाहीर सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 6, 8 व 9 सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (सरफेसी कायदा) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत.

याद्वारे कर्जदार / जामीनदार / गहाणकार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की विविध आर्सिल ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून काम पाहणाऱ्या ॲसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड ("अर्सिल") कडे तारण / भाग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांची (नोंदणीकृत अभिहस्तांकन करारान्वये वित्तीय मत्तांचे अभिहस्तांकन केल्यानंतर) सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 ("नियम") मधील नियम 6, 8 व 9 सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (''कायदा'') मधील तरतुदीच्या अनुषंगाने खाली दिल्यानुसार थकबाकी रकमेच्या पुढील व्याज, शुल्के व खर्च इ. सह वसुलीसाठी ऑनलाईन ई-लिलावाच्या माध्यमातून ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' आणि " उपाय नाही" तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / गहाणदार यांचे नाव	कर्ज खाते क्र. आणि विक्रेती बँक	ट्रस्ट नाव	सर्फेसी सूचना दिनांकानुसार थकबाकीची रक्कम	ताबा प्रकार आणि दिनांक	पाहणीचा दिनांक	मालमत्तेचा प्रकार आणि क्षेत्रफळ	ईसारा रक्कम ठेव (ईरठे)	आरक्षित किंमत	ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ
कर्जदार : सौ. उषा प्रकाश काळोखे आणि श्री. प्रकाश दादा काळोखे	06200001480 दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि. (डीएचएफएल)	अर्सिल-रिटेल लोन पोर्टफोलिओ-047-ए-ट्रस्ट"	रु. 6,37,583/- (रुपये : सहा लाख सदतीस हजार पाचशे त्र्याऐंशी फक्त) दि. 23-06-2014 रोजी नुसार + त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च	15-फेब्रुवारी-2024 रोजी प्रत्यक्ष	विनंतीवरून व्यवस्था केली जाईल.	पूर्ण मालकीची प्लॉट क्षेत्रफळ 67.50 चौ. मी. बिल्ट अप क्षेत्रफळ 49.14 चौ. मी.	रु. 148500/- (भारतीय रुपये एक लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे फक्त)	रु. 14,85,000/- (भारतीय रुपये चौदा लाख पंच्याऐंशी हजार फक्त)	06-02-2025 रोजी दुपारी 12.30 वा.

लिलाव होत असलेल्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन : सौ. उषा प्रकाश काळोखे यांच्या मालकीची मालमत्ता : रो रेसिडेन्सी क्र. - 6, सर्व्हे क्र. - 256/2, प्लॉट क्र. 25 ते 28/6, श्रीपाद रो रेसिडेन्सी, कॉटेज कॉर्नर, अंकुर शाळे च्या मागे, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र - पिनकोड : 414002 (आरसीसी बांधकाम मोजमाप प्लॉट क्षेत्रफळ 67.50 चौ. मी. बिल्ट अप क्षेत्रफळ 49.14 चौ. मी.).

अर्सिल यांना ज्ञात असलेले प्रलंबित दावे	निरंक	अर्सिल यांना ज्ञात असलेले बोजे / थकबाकी	निरंक
बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक	लिलावाच्या दिवशी 2 तास आधी	बोली वृद्धी रक्कम : रु. 5,000/-	बोली दस्तावेजात नमूद केल्याप्रमाणे
ज्यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट काढायचा आहे त्यांचे नाव	अर्सिल-रिटेल लोन पोर्टफोलियो-047-ए-ट्रस्ट	येथे देय : पुणे	
आरटीजीएस चा तपशील :	ख